**महाराष्ट्र शासन**

नगर विकास विभाग,

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,

४ था मजला, मुख्य इमारत, मंत्रालय, मुंबई-३२.

दूरध्वनी क्रमांक :- ०२२-२२७९४२०७ Email ID :- mohsin.bagwan@nic.in

क्र.संकिर्ण-२०२१/प्र.क्र.२०८/नवि-२० दिनांक :- २९ जून, २०२१

प्रति,

१) आयुक्त, सर्व महानगरपालिका

२) आयुक्त तथा संचालक,
नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई

३) सर्व जिल्हाधिकारी

विषय:- शासकीय, निम-शासकीय किंवा खासगी जमिनींवरील अनधिकृत झोपडपट्ट्या व अन्य बांधकामे पावसाळ्यात न तोडण्याबाबत...

संदर्भ :- शासन परिपत्रक महसूल व वन विभाग क्र. संकिर्ण-२०००/प्र.क्र.१३९/ज-१ दिनांक १०.०२.२००१

महोदय,

उपरोक्त विषयाबाबत महसूल व वन विभागाने निर्गमित केलेले शासन परिपत्रक दिनांक १० फेब्रुवारी २००१ चे कृपया अवलोकन व्हावे. (प्रत सोबत जोडलेली आहे.)

पावसाळ्यात अनधिकृत बांधकामांवर / झोपडपट्ट्यांवर कारवाई केल्याने त्यातील राहणारे रहिवाशी बेघर होतात व अशा बेघर लोकांना नागरी बेघर म्हणून पुन्हा महानगरपालिकेमार्फत / नगर परिषदेमार्फत पुन्हा नागरी निवारा केंद्रामध्ये समाविष्ट करुन घ्यावे लागते व पर्यायाने नागरी बेघर निवारी केंद्राच्या नियोजनावर त्याचा विपरित परिणाम होतो. त्यामुळे पावसाळ्यात निष्कासनाची कारवाई करु नये, अशा सूचना राज्यस्तरीय नागरी बेघर नियंत्रण समितीनेही केल्या आहेत.

राज्यातील सर्व शासकीय, निम-शासकीय अथवा खासगी जमिनीवरील अनधिकृत झोपडपट्ट्या किंवा अन्य अनधिकृत बांधकामे दरवर्षी पावसाळ्यात म्हणजेच दि. ०१ जून पासून दि. ३० सप्टेंबर पर्यंतच्या कालावधीत पाडण्यात येऊ नयेत अशा सूचना संदर्भाधीन शासन परिपत्रकान्वये महसूल व वन विभागाने संबंधितांना दिलेल्या आहेत. तसेच सदर आदेश ज्या प्रकरणामध्ये लागू होणार नाहीत अशी प्रकरणे सदर परिपत्रकामध्ये नमूद केलेली आहेत. तेंव्हा सदर परिपत्रकातील सूचनांनुसार कार्यवाही करण्यात यावी. तसेच सदर सूचनांप्रमाणे कार्यवाही करण्याबाबत सर्व संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना देण्यात याव्यात व अशा प्रकरणी नियमानुसार कार्यवाही करण्याची दक्षता घ्यावी.

आपला,

(शंकर त्र्यं. जाधव)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

सहपत्र :- वरीलप्रमाणे